युवा प्रबोधन या क्षेत्रामध्ये गेली दोन दशके अव्याहतपणे विविध माध्यमांमधून सामाजिक दृष्टीकोन ठेऊन विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणारे, प्रेरणादायी वक्ते, लेखक, समुपदेशक, प्रशिक्षण अधिकारी, अभियंता, शिक्षक, लघुपट दिग्दर्शक, निवेदक, सूत्रसंचालक, गायक, अभिनेता, सामाजिक कार्यकर्ता आदी भूमिका एकाच वेळी निभावणारे, राज्यभर करिअर मार्गदर्शक म्हणून सुपरिचित असलेले प्रा. विजय नवले यांच्याशी केलेली बातचित .....

प्रश्न- व्याख्यानातून करिअर प्रबोधन करता म्हणजे नेमके काय करता?

प्रा. विजय नवले - मी गेली वीस वर्षे करिअर विषयावरील प्रबोधन करत आहे. आजपर्यंत सामाजिक संस्था, शाळा, महाविद्यालये, वर्तमानपत्रे, विद्यापीठे , शासकीय विभाग यांनी आयोजित केलेल्या राज्यभरातील सुमारे दोन हजार हून अधिक व्याख्यानांचे निमंत्रण स्विकारून हे काम सातत्याने करू शकलो आहे. करिअर म्हणजे नेमके काय , हेच मी सांगत आहे. व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माण हा मुद्दा "माय नेशन माय करिअर" असा संदेश देऊन पोहोचविण्याचा माझा प्रयत्न असतो.

व्याख्यानांमधून काही महत्वाचे मुद्दे पोहोचावेत असा माझा ध्यास असतो. जसे की,

१) आनंद आणि कामातील समाधान हे करिअरची महत्वाचे मापदंड आहेत.
२) आवडीच्या क्षेत्रात काम करावे अथवा जे क्षेत्र मिळाले आहे त्यात आवड निर्माण करावी.
३) सर्व क्षेत्रांमध्ये संधी असते, फक्त त्या क्षेत्रामध्ये आपल्याला संधी आहे का, याचा विचार करणे आवश्यक असते.
४) मला एखाद्या क्षेत्रातून काय मिळणार यापेक्षा मी त्या क्षेत्राला काय योगदान देणार , याचा विचार व्हावा.
५) करिअरच्या निवडीत पैसा केंद्रस्थानी ठेवण्यापेक्षा कर्तृत्व केंद्रस्थानी ठेवावा.
६)चांगल्या कामाला स्पर्धा नसते
७) समाजाच्या आजच्या समस्या पाहा आणि त्या सोडविण्याच्या प्रक्रियेत काय करावे लागेल, असा तळमळीचा विचार करिअर निवडीत अग्रणी असल्यास मोठे करिअर होईल.
८) आगामी पाच सहा वर्षे कष्ट करून त्यापुढील आयुष्य सुखसमाधानात काढण्याचा पर्याय निवडल्यास लाभ अधिक. उलट ही पाच सहा वर्षे मजेत काढणे पुढच्या वाटचालीत तोट्याचे ठरेल.
९) त्यादृष्टीने कौशल्य विकास, अभ्यास, मेहनत करून करिअरची पायाभरणी करावी.
१०) शालेय तसेच महाविद्यालयीन जीवनात विविध क्षमता विकसित करण्याच्या कामात वेळ द्यावा.
११) कोणत्याही करिअरमध्ये काम उत्तमपणे , मनापासून आणि झोकून देऊन केल्यास पैसा, प्रसिद्धी प्रतिष्ठा, अधिकार समाधान हे सगळे आपल्या मागे येऊ शकते.

१२) मी कोण होणार यापेक्षा मी काय करणार हे प्रामुख्याने ठरवावे.
१३) करिअर ही समृद्ध जीवनशैली आहे

असे अनेक विचार व्याख्यानांद्वारे नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे या मार्गदर्शनातून शक्य आहे. एका अर्थाने परिपूर्णतेकडे जाणारे व्यक्तिमत्व घडविणे, सामाजिक संवेदनशीलता असलेले मन तयार होणे, त्यातून कर्तुत्ववान चारित्र्यसंपन्न पिढी तयार होणे हा करिअर प्रबोधनाचा महत्वाचा आशय आहे.

यासाठी मी ग्रामीण महाराष्ट्रात खूप प्रवास केलाय. लाल एसटी ने भरपूर फिरलोय. क्वचित एखाद दुसरा अपवाद सोडला तर मानधनासाठी कोणतेही व्याख्यान नाकारले नाही. उलट आजपर्यंत ९० टक्क्यांहून अधिक व्याख्याने विनामूल्य केलीत. कारण माझा मूळ हेतू तो नाहीये. डोंगरापलीकडच्या गावातील शाळा, वस्तीभागातील मुलांसाठीचे भाषण, पाड्यांवरचे शिबिर मी कधीच चुकवत नाही. एकेका दिवशी पाच भाषणे, माईक नसतानाही बोलणे तसेच अतिभाषणांमुळे घशाचे ऑपरेशन करावे लागले. तरीही त्यानंतर व्याख्यानांत खंड नाही. नोकरी सांभाळून हे सर्व खूपच कठीण असले तरीही आत्तापर्यंत जमलंय.

व्याख्यानांचे विषय गंभीर असले तरीही मांडणीची पद्धत, सुसंगत किस्से, उदाहरणे, विनोदी प्रसंग, खुमासदार शैली यामुळे विद्यार्थ्यांना हसतखेळत ज्ञानप्राप्तीचा आनंद मिळतो. सर्वात महत्वाचे म्हणजे प्रेरणा मिळते. यापूर्वीची बारीक सारीक अपयशे विसरुन श्रोता उभारी घ्यायला लागतो. मी माझी, माझ्या आईवडीलांची स्वप्ने पूर्ण करू शकतो इथपासून मी ठरवलेच तर मी एखादया मोठया कार्य क्षेत्रातील अग्रणी व्यक्ती बनू शकतो , असा विचार त्यांच्या मनात निर्माण व्हायला लागतो.
व्याख्यान चालू असताना मिळणारा प्रतिसाद, प्रतिक्रिया , टाळया , व्याख्यानानंतरचा रंगलेला प्रश्नोत्तराचा तास, आयुष्याला दिशा मिळाली असे सांगणारा श्रोतावर्ग वगैरे मुळे मी व्याख्यान खर्या अर्थाने जगत असतो. तो माझा श्वास आहे.

संपूर्ण जगात सुजलाम, सुफलाम आणि समृद्ध भारत बनविणे, जगाचे सन्मानपूर्वक नेतृत्व भारताने करणे या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी भारावून गेलेली युवा पिढी तयार करणे, ही माझी व्याख्यानांसाठीची मूळ प्रेरणा आहे. आगामी वीस वर्षे भारतीय युवक युवतींच्या कर्तुत्वातून भारत एका वेगळया टप्प्यावर जाऊ शकतो, पण आळसाने पिडीत झालो तर काहीच शक्य नाही, हेही मी बोलतोय. जगातील सर्वाधिक समाधानी, सुखी आणि आनंदी माणसांचा देश भारत कसा होऊ शकेल, ही माझ्या मांडणीची मुख्य रचना आहे.

माणसं पैसा कमावणारी केवळ यंत्र नाहीत, त्याही पलीकडचे समृद्ध जीवन आपल्याला जगायचे आहे हे मी ठामपणे सांगण्याचा प्रयत्न करतोय. हे म्हणजेच माझे करिअर प्रबोधन आहे.

प्रश्न - तुमचा वक्तृत्वाचा प्रवास कसा सुरु झाला?

प्रा. विजय नवले - मी कोणत्याही वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला नव्हता. अगदी महाविद्यालयीन शिक्षण संपेपर्यंत माझा अशा कोणत्याही व्यासपीठाशी संपर्क विशेष आला नाही. उलट धीटपणे पुढे उभे राहून बोलणे याचा दुरान्वयेही माझा संबंध नव्हता .आपली भाषा ग्रामीण ढंगाची तर नाही ना, ही एक मोठी भीती होतीच. फक्त एक मात्र लहानपणापासून घडले म्हणजे, मी एकाग्रतेने ऐकायचो. आमचे वडील रात्री जेवताना जे सांगत ते मी खूप मनापासून ऐकायचो. जिथे कुठे काही भाषण ऐकले, चित्रपट पहिला,प्रसंग अनुभवला ते मी मित्र, कुटुंबीय यांना पुन्हा पुन्हा सांगायचो. वक्तृत्व इथून सुरु होते. ऐकताना डोळ्यासमोर उभा राहिलेला प्रसंग जशाच्या तसा आपण बोलताना आपल्या ऐकणाऱ्यांना तसाचा तसा उभा करायचा, इतक्या एकाग्रतेने केल्यास वक्तृत्वाची पायाभरणी शक्य होते.

खूप मनापासून बोलले की लोक मनापासून ऐकतात. ज्यांना वक्ता व्हायचंय त्यांनी अशी सवय लावाच. बोलते व्हा. मुद्देसूद, अचूकपणे, टायमिंग साधून, विनोदी वृत्तीचा वापर करत शक्य असल्यास गांभीर्य वाढवत वगैरे सांगता आले पाहिजे. मी एकदा अकरावीत असताना क्रिकेटच्या टूर्नामेंट मधील मॅच चे समालोचन करण्याचे धारिष्ट दाखविले होते. तो पहिला पकडलेला माईक!! लोकांना अपूर्वाई असते शैलीदार बोलणे ऐकायचे ! निर्भय बनल्यास शक्य होते. आनंदाने बोललो की लोक ऐकतातच . वर्गात जरी मी पुढे येऊन बोललो नाही तरी काही सामाजिक आंदोलनांत सहभागी झालो होतो. असाच एक प्रसंग , शनिवार वाड्याच्या बाहेर दोन अडीचशे लोकांची सभा जमली. तेव्हा उत्साही युवक कार्यकर्ता म्हणून मी पहिल्यांदा जाहीरपणे बोललो होतो. समोरची गर्दी काही मला ऐकायला अधीर नव्हती. मला कुणी ओळखतही नव्हते. पण मला स्टेज चा अनुभव मिळाला. एकदा भीती मेली कि मग मागे वळून बघायची गरज राहत नाही.

मी सुदैवी होतो प्राचार्य शिवाजीराव भोसले, अविनाश धर्माधिकारी, बाबासाहेब पुरंदरे, डॉ. नरेंद्र जाधव, श्रीकांत जिचकार यांची भाषणे ऐकायला मिळाली. सायकलवरुन वक्ते आणि भाषणे गाठली. लाडीक प्रेम करण्याच्या वयात व्याख्यानांच्या मागे लागलो. खूप भाषणांची पारायणे झाली. मग योगायोगाने प्राध्यापक झाल्यावर तर माझी चंगळच झाली. कारण रोज ३-४ वेळा ५०-६० मुलांपुढे बोलायची संधी मिळत गेली. ती नोकरी होती पण मी प्रत्येक तास व्याख्यान म्हणूनच समजायचो. मुलांचा प्रतिसाद मला प्रेरणा देत गेला. पण वर्गात भूक भागत नव्हती म्हणून ग्रामीण भागात, वस्ती भागात विनामूल्य तत्वावर भाषणे ठोकायला लागलो. ती सुरुवात होती. लोकांना आवडत गेले म्हणून अजूनही बोलत आहे.

प्रश्न - करिअर  मार्गदर्शनाचे काम कोणकोणत्या माध्यमांमधून काम करणे शक्य आहे ?

प्रा. विजय नवले  - विद्यार्थी आणि पालक तसेच विविध कार्यक्षेत्रांमध्ये ध्येय भावनेने प्रेरित होऊ इच्छिणारे सर्वच जण यांना करिअर मार्गदर्शनाची गरज असते. व्याख्यानांच्या माध्यमातून थेटपणे या घटकांपर्यंत पोहोचून मार्गदर्शन करता येते. विविध कार्यक्षेत्रांची माहिती सांगणे, प्रेरणादायी उदाहरणे सांगणे, बदलत जाणाऱ्या स्कोप चा उल्लेख करणे, या कार्यक्षेत्रांमध्ये दाखल होण्यासाठीची तयारी, क्षमतावृद्धी इ. ची माहिती अभ्यासपूर्ण तसेच रंजकपणे सांगणे, श्रोत्यांना कार्यप्रणव करणे हे या माध्यमातून शक्य असते. श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन शंकानिरसन करता आले पाहिजे.

वर्तमानपत्रे, नियतकालिके, वेबसाईट, पुस्तके यांद्वारे लेखन करूनही अनेक गरजूंपर्यंत माहिती पोहचविता येते. इथे मुद्देसूद माहिती देणे अपेक्षित असते. रेडिओ दूरचित्रवाणी, यु ट्यूब  मार्फत दृकश्राव्य माध्यमातून मार्गदर्शन करता येते.

सोशल मिडीयाचा वापर करूनही सहजपणे करिअर चे प्रबोधन करता येते. सर्वात महत्वाचे म्हणजे समुपदेशनाद्वारे विद्यार्थी आणि पालक यांच्याशी चर्चा करत ,बारकाव्यांचा आढावा घेत, विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा अंदाज घेत परिपूर्णतेकडे जाणारी चर्चा सुयोग्य निर्णयाकडे जाते. माझ्या सुदैवाने अत्यंत कमी वयात रेडिओ, दूरचित्रवाणीद्वारे माझे 'लाईव्ह फोन इन' कार्यक्रमझाले. दूरदर्शन, आय बी एन लोकमत, जय महाराष्ट्र, झी टी व्ही आदी टिव्ही चॅनेल्स वरून करिअर मार्गदर्शनासाठी अनेकवेळा निमंत्रित करण्यात आले. आकाशवाणी  केंद्रां वरून ५३  मुलाखती प्रसारित झाल्या.

शेकडो लेखांद्वारे वाचकांपर्यंत  पोहोचता आले. सोशल मीडियाद्वारे  मी आणि महेश नरके यांनी तयार केलेला "करिअर पाथ फाईंडर" तक्ता निशुल्क पणे जगभरातील करोडो विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला ज्यातून त्यांना करिअरचा निर्णय घेणे शक्य झाले, याचा विशेष आनंद आहे. फोनवरून  शंका विचारणारे, अनोळखी असूनही, अशा हजारो विद्यार्थ्यांना  दूरध्वनीद्वारे विनामूल्य मार्गदर्शन करू शकतो. ही सगळी माध्यमे जनकल्याणाची असून त्या द्वारे करिअर मार्गदर्शन शक्य आहे.

प्रश्न - लेखन कौशल्य कसे विकसित करावे ?

प्रा. विजय नवले - लेखन  उत्तमपणे विकसित करणे प्रत्येकाला शक्य आहे. मोठी अवघड वाक्य, न समजणारी  वाक्यरचना कुणालाच नको असते. लेखक होऊ इच्छिणाऱ्याने मनात जे आहे ते थेटपणे उतरवले  पाहिजे. वाक्ये छोटी आणि अर्थपूर्ण असावीत. वाचकांच्या मनाचा ठाव घेता आले तर उत्तमता

साध्य होते. अचूक माहिती देणे, नवे विचार देणे, प्रेरित करणे, वैचारिक प्रगल्भता विकसित करणे, दिशा देणे, वाचनातून आनंद देणे आदी अनेक उद्देश लेखनाचे असू शकतात.

खूप वाचन असणे, परिस्थिती आणि प्रसंग यांचे सुनिरीक्षण करता येणे, विवेचन करण्याची सवय, नेमकेपणे मांडणी करणे, वैचारिक परिपक्वता असणे, विषयांचा सखोल अभ्यास असणे, इ. बाबी उत्तम लेखनासाठी अत्यंत पूरक ठरतात.

आधी मुद्दे काढणे आणि मग त्यावरून लिखाण करणे ही एक पद्धत आहे तर थेट लिहायला सुरुवात करणे आणि मग अंतिमतः पुन्हा एकदा हात फिरविणे ही दुसरी पद्धत आहे. लेखनाच्या प्रकारनुसार देखील त्याची तयारी ची पद्धत बदलेल.

मी मला येणारे अनुभव, निरीक्षण, विवेचन, समीक्षण, विचार मंथन यातून लिहीत राहतो. क्रमिक पुस्तकांसाठीचे लेखन करताना मात्र विस्तृत अभ्यास करून लिहावे लागते. संदर्भ अचूक ठेवावे लागतात. इथे विचार मांडण्यापेक्षा वैश्विक मान्यता असलेले शास्त्रीय मुद्दे महत्वाचे असतात. मला आनंद वाटतोय करिअर तसेच अभियांत्रिकी, डिप्लोमा, मॅनेजमेंट आदी शाखांसाठी २२ क्रमिक पुस्तकांचे लेखन मी करू शकलो. विविध वर्तमान पत्रांमधून युवक, शिक्षण, करिअर, सॉफ्ट स्किल्स विषयांवर विपुल लेखन करता आले. लेखन ही एक चांगल्या अर्थाने धुंदी आहे. आपणही सर्वांनी आपापल्या क्षेत्रातील विषयांवर लिखाण जरूर करावे. आपल्यात लपलेला लेखक कागदांवर उमटू लागेल तेव्हा आनंद होईल. याही क्षेत्रात पैशापेक्षा गुणवत्तेवर भर दिल्यास सिद्धी आणि प्रसिद्धी दोन्ही प्राप्त होईल. त्यानंतर पैसाही मिळेल. पण लेखन प्रसिद्ध झाल्यानंतर चा आनंद काही औरच !

प्रश्न- एकाच वेळी अनेक आघाड्यांवर काम करणे, कसे शक्य असते ?

प्रा. विजय नवले - मुख्य काम सांभाळून एकाच वेळी अनेक किंवा एकामागून एक अशा अनेक कार्यक्षेत्रांत आनंदाने काम करणे म्हणजे मल्टी करिअर! किशोरकुमार, प्र. के. अत्रे ही मंडळी अशीच अफलात माणसं !!

प्र. के. अत्रे हे शिक्षक, वक्ते, लेखक, कवी, पत्रकार, संपादक, राजकारणी, निर्माता, दिग्दर्शक, उद्योजक, आदी अनेक भूमिका सक्षमपणे वठवू शकले. माझे ते लहानपणापासून आदर्श आहेत. हिरो आहेत. कामात बदल म्हणजे विश्रांती (रिफ्रेशिंग) या नियमाला अनुसरून अनेक कौशल्यांचा विकास करणे खरं तर शक्य ही असतं. असे करण्यात परमानंद आहे. एका कामाचा कंटाळा म्हणून नव्हे, तर बरंच काही करत राहायला आवडते म्हणून तशी विविध कामे करण्याची इच्छा होत असते. वेळेचे नीट व्यवस्थापन केले की आवडीच्या अनेक गोष्टींसाठी सवड काढता येते.

मी देखील अभियांत्रिकी शिक्षणातील बीई, एमई शिक्षण करुन (एम ए) इतिहास, (बी जे) पत्रकारिता, (एम बी ए) मॅनेजमेंट या विषयांमधील शिक्षण पूर्ण करु शकलो. सध्या तंत्रज्ञान विषयात पीएचडी करतोय. डॉ. जिचकार हे यातील आदर्श. नोकरी करत करत लिखाण करतो. त्याच विषयांवर व्याख्यानांची  निमंत्रणे येतात. विद्यार्थी उपक्रम करण्याची संधी मिळते. विद्यार्थी समुपदेशन माझा आवडता छंद. खरे तर ही सगळी शिक्षकाचीच कामे आहेत. पण हे करत असताना संशोधन, सामाजिक उपक्रम, लघुचित्रपट, माध्यमांमधील मुक्त पत्रकारिता, गायन हे पण खुणावते आणि आपणही ते करतो. अपघात, शेतकरी आत्महत्या, सुरक्षितता, पर्यावरण या विषयांतील समस्यांवर प्रॉडक्ट डिझाईन च्या अनुषंगाने  आम्ही संशोधन करतोय. शिक्षण, विद्यार्थी विकसन, करिअर निवड - पायाभरणी, सॉफ्ट स्किल्स, उद्योजकता, आनंदी अभ्यास, पालकत्व, कौशल्य विकसन, रोजगारभिमुखता आदी विषयांवर कृतीकार्यक्रम राबवत आहे.

राष्ट्रनिर्माण प्रतिष्ठान च्या माध्यमातून या सर्वच सामाजिक, युवक, शिक्षण विषयांवर प्रबोधन, संघटन, प्रशिक्षण, आणि समस्यानिराकरण स्वरुपाचे काम युवकांच्या साथीने उभे राहत आहे. सामाजिक आशय असलेल्या लघुपटांमध्ये  अभिनय, दिग्दर्शन तसेच निर्मिती मध्ये सहभाग शक्य झाला. वैकुंठ , पाढा, मिक्सर, कल से मत आना, कुर्सीक्रसी आणि अनन्या या लघुचित्रपटांना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. सध्या तीन दैनिकांमध्ये आणि चार नियतकालिकांमध्ये सामाजिक प्रश्न , शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास आदी विषयांवर स्तंभलेखन चालू आहे. आणि अधूनमधून किशोरकुमार ची गाणी स्टेजवरून गाण्याचा प्रयत्नही करतोय. थोडक्यात काय तर, या सर्व गोष्टी आपल्या आयुष्याला रिफ्रेश करत असतात. कामे आणि कौशल्ये  वेगळी वाटली तरीही एकमेकांना पूरक बनत जातात. मुख्य असतो तो आनंद.

आपण सर्वच जण बरंच काही करु शकतो, असा माझा विश्वास आहे. परिपूर्ण कुणीच नसतो. पण जीवनाचे हे रसस्वाद घेणे प्रचंड आनंददायी असते. शिक्षक असूनही शॉर्ट फिल्म, अभिनय, दिग्दर्शन, टिव्ही, रेडीओ, थिएटर करणे विद्यार्थ्यांनाही भावते. वर्गात तंत्रज्ञानावर बोलून नंतर लगेच मराठी साहित्यात रमणे , सभा गाजविणे या सर्वात मौज आहे. आपल्या महाराष्ट्रात खूप मोठी अष्टपैलू माणसं होऊन गेली.आपण तर कुणीच नाही. हळूहळू प्रयत्न करायचे. जे ठरवू ते प्रत्यक्षात व्हायला लागते. उलट अनेकदा हेही वाटते की आपल्याला अजून बर्याच गोष्टी जमत नाहीत. मग पुन्हा तिथे लक्ष घालायचे. दिवसाचे नियोजन तारेवरची कसरत असते. पण आळसात दिवस वाया जाण्याची वेळ येत नाही , म्हणूनही असे बिझी राहणे, कधीही श्रेयस्करच !!